CR2016080213

209


# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051
दुरध्वनी : 26556799, फॅक्स : 26556805, ई -मेल : collectormsd@gmail.com


क्रमांक :सी/कार्या-3क/एकत्रि/पोवि/कावि-837/16
दिनांक : 2/8/2016

परिपत्रक:-

**विषय:- झोपडपट्टी प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील मिळकतीचे एकत्रिकरण / पोटविभाजना बाबत.**

**संदर्भ :- क्र. झोपुप्रा/न.भू./कार्यासन-1/टे.एस-1 सामिलीकरण/ पोटविभाजन/मंजूरी/09, दि.18.6.2009 चे परिपत्रक.**

मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडील संदर्भिय परिपत्रक दि.18/6/2009 मध्ये नमूद केले आहे की, विकास नियंत्रण नियमावली, 1991 चे नियम 33 (10) मधील शासनाची अधिसूचना क्र. डी.सी.आर.1095/2009/सी.आर 2073/95/युडी 11, दि.15.10.1997 अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा विविध प्रकारच्या मंजुऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून देण्यात येत आहेत. त्यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील सर्व झोपडपट्टी व्याप्त जमिनीचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मंजुरीप्रमाणे / निकषा प्रमाणे एकत्रिकरण / पोटविभाजन करण्याचे आदेश प्राधिकरणामार्फत निर्गमित केले जातात व याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून स्वतंत्र आदेश देण्याची आवश्यकता नाही. त्याप्रमाणे अधिक्षक नगर भूमापन व भूमि अभिलेख, मुंबई शहर व सर्व नगर भूमापन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी नगर भूमापन नकाशा व दुरूस्ती मिळकतपत्रिका उघडून कार्यवाही करण्याची आहे. पोटविभाजन / सामिलीकरण करताना नगर भूमापन क्रमांक व क्षेत्रामध्ये काही बदल झाल्यास त्याप्रमाणे अहवाल झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे सादर करण्याचा असून त्यानुसार सुधारित आदेश प्राधिकरणातर्फे निर्गमित करण्यात येतील. सदरची कार्यवाही त्वरित व तात्काळ करण्याची आहे. जेणेकरून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची प्रकरणे जलद निकाली निघून योजना पूर्णत्वास मदत होईल.

तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत निर्गमित करण्यात येणारे एकत्रिकरण / पोटविभाजन आदेशाचे अवलोकन करता निदर्शनास येते की, झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या मिळकतीचा धारणाधिकार व सत्ता प्रकार एकच नसताना देखील सदर मिळकतीचे एकत्रिकरण / पोटविभाजन करण्यात आलेले आहे. सदरचे आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांतील तरतुदीस अनुसरून नाही.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 मधील कलम 85 व 87 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (धारण जमिनीचे विभाजन) नियम, 1967 त्याचप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल (महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, 1969 मध्ये एकत्रिकरण / पोटविभाजना बाबतची तरतुद नमूद केलेली आहे. सदर तदतुदीनुसार एखाद्या मिळकतीचे एकत्रिकरण किंवा पोटविभाजन करावयाचे झाल्यास त्याबाबत सक्षम अधिकारी जिल्हाधिकारी आहेत.

तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी निर्गमित केलेले दि.18/6/2009 च्या परिपत्रकामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 व त्याखाली तयार करण्यात

आलेल्या नियमातील एकत्रिकरण / पोटविभाजना बाबतची कोणतीही तरतुद नमुद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे उक्त अधिनियमान्वये एकत्रिकरण / पोटविभाजन बाबतचे आदेश पारीत करणेसाठी कोणतेही अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना असल्याचे दिसून येत नाही.

तसेच येथे प्रामुख्याने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 चे तरतुदीनुसार एकत्रिकरण / पोटविभाजन बाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ इत्यादी नियोजन प्राधिकरण यांचेमार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या मंजूर अभिन्यासाप्रमाणे आवश्यक एकत्रिकरण / पोटविभाजन आदेश संबंधित संस्था जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियमित घेत असतात.

यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेमार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या एकत्रिकरण / पोटविभाजन आदेशाचा अंमल यापुढे 7/12 व मिळकतपत्रिकेत घेण्यात येऊ नये. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर परिपत्रकानंतर देखील मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडील एकत्रिकरण / पोटविभाजन आदेशाचा अंमल 7/12 व मिळकतपत्रिकेत घेण्यात आल्यास संबंधितांविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

प्रति:-

1)प्रधान सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032. यांना माहितीसाठी सविनय सादर.

2)प्रधान सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-400 032. यांना माहितीसाठी सविनय सादर.

3)विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

4)मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू.), मुंबई-400 051. यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

5)जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

6)सर्व नगर भूमापन अधिकारी यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(नितीन महाजन)
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर करीता

स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे